सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)
स्टेशन रोड, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
"In Pursuit of Technical Excellence"
☎ - office: (0240) 2366101, 2366102, 2366111

**e-mail** – office.gcoeaurangabad@dtemaharashtra.gov.in **web :** www.geca.ac.in

**परीक्षा विभाग**

---

शाअमछसं/परिक्षाविभाग/२०२५/७१ दि. १२.०३.२०२५

## परिपत्रक (अत्यंत महत्वाचे),

विषय:–**शै.वर्ष २०२४–२५ करिता सत्रातील विद्यार्थ्यांना CAARY ON लागु करणेबाबत**

संदर्भ:– ०१) महाराष्ट्र शासन निर्णय संकीर्ण–२०२५/ई–९७०२२०/विशि–३
दिनांक १०/०२/२०२५

उपरोक्त संदर्भाचे विषयानुसार संस्थेतील सर्व शाखांचे व अभ्यासक्रमांचे सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की,शैक्षणिक वर्ष २०२४–२५ करिता अभियांत्रिकी अभ्यासक्रमाशी संबधित विद्यार्थ्यांना महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांनी CAARY ON सुविधा उपलब्ध करून दिली आहे. संदर्भिय निर्णयानुसार खालील निर्देशाप्रमाणे CAARY ON सुविधा घेण्यास विद्यार्थी पात्र राहतील.

१. प्रथम वर्षामध्ये अनुत्तीर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांना तृतीय वर्षाच्या पाचव्या सत्राकरिता, द्वितीय वर्षामध्ये अनुत्तीर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांना चतुर्थ वर्षाच्या सातव्या सत्राकरिता तसेच वरिल वर्गात प्रवेश देण्याची पात्रता ही समसत्र २०२३–२४ (म्हणजे उन्हाळी परिक्षा २०२३–२०२४) च्या परिक्षांच्या निकालाऐवजी विषमसत्र २०२४–२५ (म्हणजे हिवाळी परिक्षा २०२४–२०२५) च्या निकालांवर ठरवण्यात येईल.
२. वरिलप्रमाणे पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वर्ष २०२४–२५ च्या विषम (हिवाळी व उन्हाळी) सत्राच्या परिक्षा एकत्रित सम (उन्हाळी) सत्राच्या परिक्षासोबत घेण्यात येतील.
३. अ.क्रं. ०१ नुसार वरिल वर्गात प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांचे विषम सत्राचे अभ्यासक्रम पुर्ण करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील. आणि यासाठी विद्यार्थ्यांना महाविद्यालयामध्ये हमीपत्र भरून देणे अनिवार्य आहे.

सदरचे निर्णय हे फक्त शैक्षणिक वर्ष २०२४–२५ करीता लागु राहतील. याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

तसेच ज्या विद्यार्थ्यांना CAARY ON सुविधा घ्यायची आहे अशा विद्यार्थ्यांनी दिनांक १८.०३.२०२५ पुर्वी विद्यार्थी विभागात अर्ज करावेत. तद्नंतर आलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

(डॉ.संजय शा.डंभारे) 12/3/25
प्राचार्य
शा.अ.महाविद्यालय औरंगाबाद, छ.संभाजीनगर.

# बंधपत्र (Undertaking)

विषय :– CAARY ON Scheme अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांना भरून द्यावयाचे बंधपत्र

०१) या स्किम अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांना विषम सत्रातील विषयाचे अभ्यासक्रम Self Learning Mode मध्ये पुर्ण करणे बंधनकारक राहील.

०२) निर्धारीत कालावधीत मी पदवी पुर्ण करू शकलो/शकले नाही तर संस्थेच्या घोषित केलेल्या समकक्ष विषयाची परीक्षा द्यावी लागेल याची मला जाणीव आहे.

०३) मी संस्थेत आवश्यक ती शिस्त पाळील. संस्थेच्या शिस्तीला बाधा येईल असे कोणतेही वर्तन करणार नाही.

०४) संस्थेच्या शिस्तीच्या नियमाचा भंग होईल असे काही मी केल्यास माझी संधी रद्द केल्या जाईल याची मला जाणीव आहे.

०५) या अंतर्गत संधीची सुविधा घेत असताना काही संस्थास्तरावर तांत्रिक अडचण आल्यास माझी कोणतीही तक्रार असणार नाही.

०६) सदर संधी अपवादात्मक परिस्थितीमध्ये केवळ ही शैक्षणिक वर्ष २०२४–२५ करीता लागु राहील याची मला जाणीव आहे.

सही

विद्यार्थ्याचे पुर्ण नाव :–

नोंदणी क्रमांक :–

अभ्यासक्रमाचे नाव :–

दिनांक :–

ठिकाण :–

Approved [signature] 18/3